# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी,
मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

**प्रेस नोट क्र-१२३** **दिनांक - २९/०३/२०२४**

**खुनाच्या गुन्हयात फरार असलेल्या मुख्य आरोपीतास राज्य उत्तरप्रदेश येथुन अटक करण्यात पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.**

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दि. १२/०१/२०२४ रोजी रात्रौ ००.३० वा. चे सुमारास मॉ दुर्गा माता मंदिराजवळ, विशाल पांडेनगर व हमीद कम्पाऊंड गौराईपाडा संतोषभवन, नालासोपारा पुर्व, ता.वसई, जि.पालघर येथे आरोपीत १) रोहन सिंग, २) मर्दा (पुर्ण नाव पत्ता माहीत नाही) ३) पिवळया रंगाचा टि शर्ट व जिन्स पॅन्ट परिधान केलेला इसम व त्याचे सोबतचे ६/७ इसम (पुर्ण नाव पत्ता माहीत नाही ) यांनी मयत सुधीर कुंजबिहारी सिंग, वय २७ वर्षे रा. मारुती चाळ, हिन्दुस्थान नाका, कांदीवली पुर्व, मुंबई यास रिक्षात जबरदस्तीने टाकुन मारहाण करत घेऊन जाऊन धारधार हत्याराने वार करुन जिवे ठार मारले बाबत दिनांक १२/०१/२०२४ रोजी १२.५९ वा. तक्रारदार श्री. वैभव रमेश मिश्रा, वय २८ वर्षे, रा. संतोष भुवन, नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर यांनी दिलेल्या तक्रारी वरुन पेल्हार पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र. I ३७/२०२४ भा.दं.वि.सं.कलम ३०२, ३६४, १४१, १४३, १४४, १४७, १४८, १४९, १२० ब प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांर्भीर्य लक्षात घेऊन मा. वरिष्ठांनी पेल्हार पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी अंमलदार यांना आरोपीत यांचा शोध घेऊन त्यांना गुन्हयाचे कामी अटक करण्याबाबत योग्य त्या सुचना देऊन आदेशित केले होते. मा. वरिष्ठांचे आदेशान्वये पेल्हार पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीरण पथकाचे अधिकारी अंमलदार यांनी तांत्रिक माहितीच्या व सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीत १) सुरज लल्लन चव्हाण, वय २५ वर्षे, २) साहिल तिलकु विश्वकर्मा, वय- २१ वर्ष, रा. ३) अखिलेश सुनिल सिंग ऊर्फ अक्की वय २७ वर्ष सर्व रा. संतोषभवन नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर यांना सिंहगड, पुणे येथुन दिनांक १३/०१/२०२४ रोजी ताब्यात घेऊन त्यांना गुन्हयाचे कामी अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हा घडल्यापासुन सदर गुन्हयातील मुख्य आरोपीत राहुल पाल ऊर्फ मर्दा हा फरार झाला होता.

सदर गुन्हयातील मुख्य आरोपीत राहुल पाल ऊर्फ मर्दा याचा शोध घेणे कामी मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र वनकोटी यांनी आदेश दिले होते. सदर आदेशान्वये पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी/अंमलदार यांनी सदर गुन्हयातील फरार आरोपीत यांच्याबाबत तांत्रिक माहिती प्राप्त केली. आरोपीत हा राज्य उत्तर प्रदेश येथे असण्याची शक्यता असल्याने पेल्हार पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी/अंमलदार हे सदर आरोपीत याचा शोध घेणेकामी जि. भदोई राज्य उत्तरप्रदेश येथे गेले. उत्तरप्रदेश येथिल भदोई जिल्हयातील चौरीबाजार या ठिकाणी आरोपीताबाबत अधिकची माहिती प्राप्त करुन सदर आरोपीत हा रामपुर जि. जौनपुर राज्य उत्तरप्रदेश येथे असल्याची खात्रीशिर माहिती मिळाली. त्यानुसार पोलीस पथकाने तात्काळ रामपुर पोलीस ठाणे जि. जौनपुर येथिल पोलीसांच्या मदतीने आरोपीत याचा साकरी या गावात रात्रौवेळेस शोध घेत असताना त्यास पोलीसांची चाहुल लागल्याने तो जंगलात पळुन जात असताना त्याचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेऊन अटक केली आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ३, विरार, श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/सोपान पाटील, पोउपनिरी/तुकाराम भोपळे, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अविनाश देसाई, फिरोज तडवी, अनिल शेगर, वाल्मिक पाटील, पो.अं./रवि वानखेडे, संजय मासाळ, मिथुन भोईर, निखील मंडलिक, किरण आव्हाड, राहुल कर्पे, दिलदार शेख, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील, नेम.पेल्हार पोलीस ठाणे तसेच पोहवा./नामदेव ढोणे, पोअंम/सोहेल शेख नेम.पोलीस उप आयुक्त कार्यालय, परीमंडळ-३ यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

